R.No. MHAMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHAMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ८९

दि.१९ मार्च २०२६,वारः गुरुवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते राज्यस्तरीय महिला गौरव सोहळ्याचे उद्घाटन



लातूर : महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातूनच नव्या युगाची निर्मिती होऊ शकते, महिलांनी पुढाकार घेतला तर कोणतेच आव्हान अशक्य नाही. महिला सक्षम तर समाज सक्षम, हीच या कार्यक्रमाची भूमिका आहे, असे प्रतिपादन 'अनाथांचे नाथ' म्हणून परिचित असलेले शिवनिश्चल प्रतिष्ठानचे अध्यक्ष यशवंत गोसावी यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त रविवार (दि.१५) रोजी दशनाम गोसावी समाज लातूरतर्फे आयोजित राज्यस्तरीय महिला गौरव सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी व्यासपीठावर समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष सूर्यकांत गिरी गोसावी, प्रमुख वक्ते यशवंत गोसावी, डॉ. धर्मवीर भारती यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी महिलांनी विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची छाप पाडल्याचे सांगत अशा उपक्रमांमुळे महिलांना प्रोत्साहन मिळते, असे सांगितले. अध्यक्षस्थानावरून सूर्यकांत गिरी गोसावी यांनी समाजातील महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव होणे ही अभिमानाची बाब असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात समाजातील श्रीमती शशिकला महादेव भारती यांना प्रतिष्ठेचा 'राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार', बीड येथील श्रीमती छायाताई अशोकराव भारती यांचा 'राज्यस्तरीय आदर्श माता प्रेरणा पुरस्कार', पुण्याच्या

श्रीमती उज्वला प्रशांत गोसावी, परभणीच्या श्रीमती कमल गोविंदराव भारती, नाशिकच्या

श्रीमती पूनम यशवंत गोसावी तसेच महिला सक्षमीकरण आणि समाजसेवेच्या ध्येयाने कार्यरत असलेल्या गोसावी वूमेन्स विंग लातूर या संस्थेला 'राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

याशिवाय विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या श्रीमती अनिता पांडुरंग गोसावी (धुळे), श्रीमती मंगलाबाई साहेबराव गोसावी (बुलडाणा), श्रीमती डॉ. स्वाती श्रीराम गिरी (यवतमाळ), श्रीमती डॉ.मनीषा बालाजी गिरी (लातूर), डॉ. अर्चना संदीपान गिरी (छत्रपती संभाजीनगर) व श्रीमती रमा गोविंदराव गिरी (बीड), डॉ. आरती प्रकाश भारती (लातूर) यांना विशेष पुरस्कार तर सामाजिक व राजकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल सिंदखेड राजा खरेदी विक्री संघाचे संचालक साहेबराव काळुगीर गोसावी आणि कृषि उत्पन्न बाजार समिती नंदुरबारचे उपसभापती अमोल प्रल्हाद भारती यांना विशेष पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी राज्यभरातून मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दशनाम गोसावी समाज लातूरचे डॉ.धर्मवीर भारती, मकरंद गिरी, प्रविण गिरी, रविकिरण गिरी, राजेंद्र गिरी, विनायक गिरी, प्रमोद बन, व्यंकटेश पुरी, मोतीबुवा गोसावी, प्द्माकर गिरी आदींनी परिश्रम घेतले.

## लातुरात शिक्षकांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन : डॉ. मिलिंद पोतदार

लातूर : लातूरच्या सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च च्या द्विदशकपूर्तीचे औचित्य साधून शिक्षकांसाठी 'विद्यार्थ्यांची मानसिकता : शिक्षकांना काय माहिती असायला हवे' या विषयावरील विशेष कार्यशाळेसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती डॉ. मिलिंद पोतदार, डॉ. मुग्धा पोतदार यांनी दिली.समाजात वावरताना प्रत्येकाला ताणतणावाचा सामना करावाच लागतो. त्यामुळे सरासरी दहापैकी चार जणांना समुपदेशनाची नितांत गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आरोग्यसेवेसोबतच सामाजिक कार्यातही आपला खारीचा वाटा उचलण्याचे काम आपण सातत्याने करत असून येत्या शनिवार दि. २१ मार्च २०२६ रोजी दुपारी अडीच वाजता लातूर आणि परिसरातील शिक्षकांसाठी विशेष कार्यशाळा डॉ. भूषण शुक्ल यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या कस्तुर कांचन सभागृहात होणार आहे. या कार्यशाळेसाठी ८५ शाळांमधील प्रत्येकी दोन शिक्षकांना निमंत्रित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच रविवार दि. २२ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता हॉटेल ग्रँड येथे बालरोगतज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ आणि न्यूरोलॉजिस्ट यांच्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी पाच वाजता दगडोजीराव देशमुख सभागृहात पुण्याचे प्रसिद्ध बालमानसोपचार तज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल यांच्या प्रमुख उपस्थितीत ' तंत्रज्ञान युगातील पालकत्व कानगोष्टी पालकत्वाच्या ' या विषयावर पालकशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'मानसिक आरोग्य विषयावरील निबंध स्पर्धा आणि रिल्स स्पर्धा' यांच्या विजेत्यांचा गौरवदेखील करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे दि. २८ व २९ मार्च रोजी दोन दिवसीय नाट्यमहोत्सव आयोजित केला आहे. यामध्ये आनंद ओवरी, मन (संवेदनशील मनाची स्पंदने), मग तू मला खा, तो राजहंस एक या नाटकांचे प्रयोग सादर होणार आहेत. प्रत्येक दिवशी दोन नाटके सादर केली जाणार असल्याचे डॉ. पोतदार यांनी सांगितले. आपल्या हॉस्पिटलमध्ये आजमितीस मानसिक आजाराच्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत. आपल्या देशात १० ते १२ हजार मानसोपचार तज्ज्ञ उपलब्ध असून ताणतणावांसह विविध प्रकारच्या मानसिक कारणावरून किमान १५ ते १८ कोटी लोकांना कोणत्या ना कोणत्या उपचाराची आवश्यकता भासू शकते.त्यामुळे मानसिक आरोग्यावरही प्राधान्याने विचार होणे गरजेचे असल्याचे डॉ. पोतदार यांनी सांगितले.

## यंदाचा राज्यस्तरीय ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार



मुंबई / प्रतिनिधी :-महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत दिला जाणारा सन २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षाचा 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार' वितरण सोहळा मंगळवार, दिनांक १७ मार्च २०१७ रोजी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ चर्चगेट मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. सदर सोहळा चर्चगेट येथील डछऊढ महिला विद्यापीठाच्या पाटकर दीक्षांत सभागृहात सायं. ५.०० वाजता संपन्न झाला, स्त्री शिक्षण, सामाजिक समता आणि महिला सबलीकरण क्षेत्रात निरलस कार्य करणाऱ्या डॉं. ऍड. मिता संजय गंगावणे यांचा गौरव या सोहळ्यात करण्यात आला.

पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.ना.श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण) हे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मा.ना.श्री. छगन भुजबळ, मंत्री, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण महाराष्ट्र राज्य हे उपस्थित होते. तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे मा. अपर मुख्य सचिव, श्री वेणुगोपाल रेड्डी आणि एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाच्या मा. कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांची प्रमुख उपस्थिती होती.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या सेवावृत्तीचा वारसा पुढे नेणाऱ्या महाराष्ट्राच्या सहा महसुली विभागातील निवडक ११ महिलांना मान्यवरांच्या शुभहस्ते सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वर्षीचे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या गौरव सोहळ्यास विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, उच्च शैक्षणिक संस्थांचे संचालक, अध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, राज्य शासनाचे विविध विभागातील अधिकारी/कर्मचारी, विद्यापीठाचे अधिकारी कर्मचारी आणि एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व इतर मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उच्च शिक्षण विभागाचे शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळानकर यांनी केले. तसेच या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व आयोजन सहसंचालक डॉ. अर्चना बो-हाडे यांनी एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाच्या सहकार्याने व डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्या मार्गदर्शनाने केले.

## लातूर स्थानिक गुन्हे शाखेची गांजाची अवैध लागवडीवर कारवाई ५.२२ लाखांचा मुद्देमाल जप्त, आरोपी अटकेत.



लातूर :- लातूर जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या कठोर मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने दिनांक १८ मार्च २०२६ रोजी अत्यंत नियोजनबद्ध कारवाई करत शेतजमिनीचा गैरवापर करून गांजाची लागवड करणाऱ्या आरोपीस अटक केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या खात्रीशीर गुप्त माहितीनुसार, मौजे गोंदेगाव, ता. जि. लातूर येथील इसम राजकुमार छत्रभुज देशमुख (वय ५६ वर्षे) हा स्वतःच्या शेतात उसाच्या पिकामध्ये लपवून गांजाची लागवड करत असल्याचे निदर्शनास आले. सदर माहितीची तात्काळ पडताळणी करून मा. पोलीस अधीक्षक, अमोल तांबे यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात छापेमारीचे नियोजन करण्यात आले.

पोलीस पथकाने गोंदेगाव शिवारातील गट क्रमांक १३२ मधील शेतात प्रत्यक्ष पाहणी केली असता उसाच्या पिकामध्ये लपवून लागवड केलेली एकूण १०८ गांजाची झाडे आढळून आली. आरोपी राजकुमार देशमुख याने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी गांजाची अवैध विक्रीसाठी लागवड केल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर गांजाची झाडे पंचासमक्ष मुळासकट उपटून पोत्यांमध्ये भरून त्यांचे वजन करण्यात आले. एकूण वजन ३४ किलो ८०५ ग्रॅम इतके असून त्याची अंदाजे किंमत रुपये ५,२२,०७५/- इतकी असून ते मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.

या धडक कारवाईत वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी पथक प्रमुख म्हणून नेतृत्व केले. त्यांच्या सोबत कारवाईदरम्यान कायदेशीर पारदर्शकता राखण्यासाठी महसूल व इतर शासकीय यंत्रणांचा समन्वय साधण्यात आला. यामध्ये नायब तहसीलदार गजानन अंबर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख,पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे, सफौ सर्जेराव जगताप तसेच पोलीस अंमलदार मोहन सुरवसे, चंद्रकांत डांगे, सूर्यकांत कलमे, संजय कांबळे, सचिन धारेकर, तुळशीराम बरुरे व पाराजी पुटेवाड, प्रदीप चोपणे ,संतोष खांडेकर, शासकीय व्हिडिओग्राफर सुहास जाधव तसेच वैध मापन शास्त्र विभागाचे निरीक्षक टी. टी. टेकाळे, कृषी विभागाचे शासकीय पंच राहुल अंधारे व दिलीप पोतदार यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली. संपूर्ण कारवाई व्हिडिओग्राफीद्वारे नोंदविण्यात आली.

सदर प्रकरणी आरोपीविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ अंतर्गत कलम ८(क) व २०(क) अन्वये पोलीस ठाणे गातेगाव येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का याचा शोध घेण्यात येत आहे. लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थांविरोधात मोहीम राबविण्यात येत असून, अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांविरुद्ध कठोर कारवाई यापुढेही सुरूच राहणार आहे.

# नाना ... एक अष्टपैलू व्यक्तिमत्व

नाना म्हणजेच अर्जुन धोंडू पुरळकर, पुरळ (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग ) गावचे सुप्रसिद्ध अष्टपैलू व्यक्तिमत्व . दि १५ मार्च २०२६ रोजी त्यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले . त्यांच्या शोकसभे निमित्त त्यांच्या अविस्मरणीय आठवणीना उजाळा देण्याचा हा छोटासा प्रयत्न.

नाना हे आमच्या पुरळ गावातील सर्वांचेच नाना होते. मी अष्टपैलू व्यक्तिमत्व यासाठी म्हणतोय कि त्यांचे वेगवेगळ्या विषयावरील वाचन, राजकीय ज्ञान , गाणी म्हणायचं छंद , काही वाद्य वाजविणे, सामाजिक बांधिलकी, क्रिकेट, बुद्धिबळ सोबत इतर खेळांबद्दलचे ज्ञान, क्रिकेट चे ज्ञान तर अफाट होते . ६५-८५ च्या काळात त्यांनी वाडीतील मुलांना क्रिकेट चे धडे द्यायला सुरुवात केली. २५ डिसेंबर १९६७ मध्ये त्यांच्याच पुढाकाराने इलेव्हन क्रिकेट स्टार्स क्लब, पुरळ या संघाची स्थापना केली. त्यावेळी या संघाचा देवगड तालुक्यात खूप दबदबा होता ... त्यावेळी तंत्रशुद्ध क्रिकेट खेळणारा हा एकमेव संघ तालुक्यात होता . ९० च्या दशकांपर्यंत हा दबदबा कायम होता . नाना व दिवंगत एकनाथ धा. पुरळकर हे क्रिकेट चे समालोचन खूप चांगल्या पद्धतीने करत असत. २२-२५ जानेवारी २०१७ ला इलेव्हन क्रिकेट स्टार्स क्लब, पुरळ या संघाचा सुवर्णमहोत्सव त्यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला.

मी मितभाषी असल्याने माझे ठराविक लोकांशी नेमकंच बोलणं होत असे, अगदी गावच्या लोकांशी देखील. साधारण मार्च १९९२ च्या पूर्वी गावी गेल्यावर नानांशी फक्त नेमकंच बोलणं होत असे. मार्च १९९२ ला ज्यावेळी मी दहावीची परीक्षा देऊन २-३ दिवसाने गावी गेलो , रिजल्ट लागेपर्यंत २-३ महिन्यांची सुट्टी होती . त्या सुट्टीमध्ये नानांशी जो ऋणानुबंध जुळला तो अगदी कालपर्यंत म्हणजेच त्यांच्या निधनापर्यंत . नानांचा स्वभाव व बोलण्याची पद्धत आपुलकीची होती म्हणून त्यांच्याशी सर्व वयोगटाच्या व्यक्तींचा संपर्क होता. सुट्टीत गावी गेल्यावर दिवसभराची भटकंती / खेळणं झाले कि संध्याकाळी नानांच्या घरी जात असे. अगदी रात्रीच्या जेवणाची वेळ होईपर्यंत त्यांच्याशी वेगेवेगळ्या विषयावर चर्चा होत असे. विविध विषयावर ते त्यांचा अनुभव शेअर करत असत. संध्याकाळच्या गावच्या बांधावरच्या चर्चा तर अगदी ज्ञानवर्धक असायच्या, ज्याचा उपयोग मला आता होतोय. घरातल्या लोकांना कधी मला शोधायचे झाले तर ते पहिले नानांच्या घरी मला शोधायचे व मी हमखास तिथेच असायचो. संध्याकाळी कधी कधी ते गावातील दुकानावर जाताना सोबत नेत त्यावेळी तेथील डॉ यश वेलणकर यांच्याशी चर्चा करण्यासाठी थांबत असत . त्या दोघांच्या अभ्यासपूर्ण चर्चा ऐकून आपल्याला देखील अवांतर वाचन वाढवायला हवे असे जाणवायचे.

मार्च १९९२- ते १९९९ पर्यंत एप्रिल - मे महिन्याच्या व दिवाळीच्या सुट्टीत सर्वाधिक वेळ नानांच्या सहवासात घालवता आला होता. त्यानंतर त्यावेळी त्यांच्याकडे मोबाईल नसल्याने व मी नोकरी ला लागल्याने मग फक्त मे महिन्यात ३-४ दिवसाच्या सुट्टीत त्यांच्याशी संपर्क होत होता. २०१६ नंतर त्यांच्याकडे मोबाईल आल्यावर मग फोनवरती आमच्या चर्चा पुन्हा सुरु झाल्या. ह्या काळात त्यांच्याशी बसपा, बामसेफ त्रिरत्न बौद्ध सहायक गण ह्यांच्याविषयीच जास्त चर्चा होत असे . मे २००९ ला ज्यावेळी आमच्या गावच्या विहाराच्या उद्घाटन ला भिक्षु मिळत नव्हते त्यावेळी त्यांनी मुंबई मंडळाच्या चिटणीस यांना माझ्याशी संपर्क करायला सांगितले. त्यांनी मला भिक्षु उपलब्ध करून देण्यासाठी विनंती केल्यावर मी २ दिवसात मंडळाला भिक्षु उपलब्ध करून दिला. त्यानंतर २०१२ ला मला सिंधुदुर्गातील बुद्ध विहारांचे फोटोज चे संग्रह करून त्याचा एक फोटो अल्बम बनवायचा संकल्प केला होता . ह्या विषयावर देखील त्यांच्याशी चर्चा करून कोणत्या गावी कसे जायचे याचे मार्गदर्शन देखील घेतले होते . २०१२-२०१४ मध्ये मी जिल्ह्यातील अनेक बुद्ध विहारांना भेटी दिल्या पण काही कारणास्तव ते काम नंतर बंद करावे लागले. त्यावेळी त्यांनी मला सांगितले होते कि, आपल्याला योग्य वाटते तर त्यासाठी प्रयन्त करायचा ... यश -अपयश चा विचार करायचा नाही .. त्यानंतर २०१५ ला कोकणातील तरुणांनी एकत्र येऊन कोकणरत्न सामाजिक संगठन चे काम सुरु झाले आणि मला देखील त्यामध्ये योग्य ती संधी मिळाली त्या संधीचा उपयोग करून मी आज माझे लेणी संवर्धन चे काम सुरु ठेवले आहे .

प. पु. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वि जयंती (२०१६) ला आमच्या पुरळ गावी मोठ्या आनंदात साजरी झाली. त्या जयंतीपासून मी गावच्या जयंतीच्या कार्यक्रम मध्ये सहभाग घेऊ लागलो .. त्यावेळी माझ्याकडे बुद्धवंदना हा कार्यक्रम असायचा. त्या जयंती ला एका मुद्द्यावर त्यांच्याशी चर्चा झाली त्यावेळी त्यांनी मला एक मोलाचा सल्ला दिला त्याचा उपयोग आजही माझ्या सामाजिक जीवनात होत आहे. मे २०१७ च्या संयुक्त जयंती मध्ये पहिल्यांदा मी सूत्रसंचालन करणार आहे अशी ज्यावेळी मंडळा ला विनंती केली होती त्यापूर्वी मी त्यांच्याशी ह्या विषयावर चर्चा केली होती . त्याप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रमात सूत्रसंचालन करताना मी १३ कविताचे वाचन केले. ह्या सर्व कविता आंबेडकरी चळवळीतील सुप्रसिद्ध कविता होत्या . ज्या कविता मी निवडल्या होत्या त्याबद्दल देखील मी त्यांच्याशी चर्चा केली होती . त्यावेळी त्यांनी मला प्रोत्साहीत करताना सांगितले कि तू बिनधास्त कर .. समोर प्रेक्षक आपलेच आहेत त्यामुळे कुठे चुकलास तरी आम्ही सांभाळून घेऊ. १ कविता व १ नृत्य असा तो सांस्कृतिक कार्यक्रम होता जो सर्वाना आवडला होता.

२०१८ हे वर्ष माझ्या सामाजिक कार्याला एक वेगळे वळण देणारे वर्ष ठरले. मे २०१८ ला मी आयु एम ए जाधव (माजी प्रशासकीय अधिकारी, मुंबई मनपा ) यांनी संकलित केलेला वर्षावास हा विशेषांक प्रसिद्ध केला होता. हा माझा प्रिंटिंग क्षेत्रातील पहिला अनुभव होता जो यशस्वी ठरला ..या अंकाच्या दरम्यान देखील मी त्यांच्याशी सातत्याने चर्चा करत होतो . त्यांना एक डमी कॉपी देखील प्रूफ रिडींग साठी पाठवली होती .. हा अंक आजही वाचक मंडळी माझ्याकडून पीडीएफ मध्ये मागून घेत असतात. त्यानंतर मी जून २०१८ पासून लेणी संवर्धन च्या कामात वाहून घेतले.. त्यानंतर त्यांच्याशी फक्त लेणी ह्या विषयावरच चर्चा होत असे .. मी ज्या ज्या लेण्या पाहिल्यात त्याची माहिती मी फोनवर त्यांच्यासोबत शेअर करत असे .. त्यांना पीडीएफ पाठवत असे पीडीएफ वाचून ते त्यातील चुका माझ्या निदर्शनास आणून देत . ह्या काळात त्यांनी देखील बौद्ध स्थापत्य शास्त्राच्या पुस्तकांचे वाचन पुन्हा नव्याने सुरु केले. मला ते काही पुस्तकांची नावे देखील सुचवत असत. मी त्यांना काही पुस्तके / मासिक दरवर्षी मे महिन्यात देत असे . त्यांच्याशी चर्चा करताना सिंधुदुर्ग जिल्ह्याचा / देवगड तालुक्याचा बऱ्यापैकी इतिहास माहिती झाला होता. मालवणचे श्याम धुरी यांचे कोकणातील गावऱ्हाटी हे पुस्तक वाचल्यावर त्यांनी स्पष्ट सांगितले होते कि, कोकणातील आपला इतिहास हा आजही अज्ञात आहे तो पुन्हा प्रकाशात आणण्यासाठी प्रयत्न कर. रत्नागिरी व सिंधुदुर्ग मधील जी काही कातळशिल्पे पाहिलीत त्याचे फोटो पाठवल्यावर ते सहज बोलून जायचे कि , ह्या माका काय बघुक मिळणार नाय , पण तुझ्या पीडीएफ मुळे ते सहज पाहायला मिळते . २०२४ ला ज्या वेळी गोव्याच्या लेण्यांचे २ दौरे आयोजीत केले त्यावेळी त्यांनी प्रोत्साहन देताना बोलले, तू जे काम करतोस त्याबद्दल तुझा अभिमान आहे आम्हाला , लोक गोव्याला एन्जॉय करायला जातात आणि तुम्ही लोक तेथील अपरिचित लेण्या पाहायला जाताय. खूप मेहनतीचे काम आहे तुझे आणि तुझ्या ग्रुपचे . सर्वांना हे शक्य होणार नाही . मध्यंतरी त्यांच्या जावयाची तब्येत ठीक नसताना ते मुंबईला भाईंदर येथे वास्तव्यास असत, त्यावेळी मी त्यांना तिथे भेटण्यास जात होतो. त्यांना माझ्यासोबत मुंबईतील काही लेण्या पाहायच्या होत्या पण काही समस्यामुळे ते शक्य झाले नाही.

मला मिळालेल्या प्रत्येक पुरस्काराच्या वेळी ते मला आवर्जून मेसेज करून अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक सदिच्छा देत असत. ऑगस्ट २०२६ च्या माझ्या पुरळ गावच्या रानफुलांच्या फोटो अलबमवर प्रतिक्रिया देताना ते म्हणतात कि , अरे ज्यांचे आयुष्य गावी गेलंय त्यांनी देखील एवढी फुल पाहिली नसतील, मला तर एवढ छान वाटतंय कि कास पठार सारखी रानफुले आपल्या गावात देखील आहेत. नोव्हेंबर २०२५ ला मी माझ्या चुलत्याच्या (शंकर पुरळकर ) पुण्यानुमोदन कार्यक्रमाला १ दिवसासाठी गावी गेलो पण त्यांची भेट घेता आली नाही. पुन्हा २६ डिसेंबर २०२५ ला गावी २ दिवसासाठी माझ्या मोठ्या भावाच्या (प्रवीण ) च्या प्रथम स्मृतिदिन साठी गावी गेलो त्यावेळी त्यांना भेटता आले . त्यावेळी देखील त्यांची तब्येत ठीक नव्हती पण त्या परिस्थितीत देखील त्यांनी गावच्या प्राथमिक शाळेत झालेल्या माझ्या सत्कार बद्दल अभिनंदन केले . त्या दिवशी मी त्यांना माझा कणकवली कॉलेज मध्ये मी जो शोध निबंध ( राजापूर तालुक्यातील मिठगवाणे येथील अज्ञात लेणी व शेजवली येथील स्तूप ) सादर करणार होतो त्याची प्रिंट दिली पण त्यांची तब्येत बऱ्यापैकी खालावल्यामुळे त्यावर त्यांना माझ्याशी चर्चा करता आली नाही. त्यानंतर पुन्हा मी १७ जानेवारी २०२६ ला गावी गेलो असताना त्यांना भेटायला खाली येत असताना अचानक घरून आई पडल्याचा फोन आल्यामुळे त्यांना न भेटताच मी माघारी गेलो . मला त्यावेळी थोडं चुकल्यासारखे वाटले पण परिस्थितीच तशी होती. त्यानंतर आईचे ते फ्रॅक्चर व २८ फेब्रुवारी २०२६ ला तिचे निधन झाले व तिच्या पुण्यानुमोदन ला मी १०-१२ मार्च २०२६ ला गावी होतो . त्या २ दिवसात मी त्यांना भेटलो पण त्यांची परिस्थिती अधिक चिंताजनक होती आणि शेवटी १५ मार्च २०२६ ला सकाळी त्यांचे निधन झाले . माझ्यासाठी ते एक मार्गदर्शक / प्रोत्साहन देणारे तर होतेच पण माझ्या आयुष्यात आलेल्या काही महत्वाच्या व्यक्तिंपैकी ते एक होते एवढे नक्की. आणि इथेच थांबतो .... नानांना शेवटची भावपूर्ण आदरांजली.

**प्रफुल्ल विश्वनाथ पुरळकर**
**(मु.पो. पुरळ, ता. देवगड जि. सिंधुदुर्ग )**

# एमआयटी लातूर येथे 'विश्वमैदान २०२६' आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजन

लातूर - युवकांमध्ये क्रीडावृत्ती, नेतृत्वगुण आणि संघभावना विकसित करण्याच्या उद्देशाने माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाच्या पुढाकारातून दि. २२ मार्च ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत विश्वमैदान २०२६ हा भव्य आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.






या क्रीडा महोत्सवामागे माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांची प्रेरणादायी संकल्पना असून एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूरचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

एकच आव्हान, जिंकूया मैदान! या घोषवाक्याखाली आयोजित करण्यात आलेल्या या क्रीडा स्पर्धेत विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील उत्कृष्ट खेळाडूंना एकत्र येऊन आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची संधी मिळणार आहे. विश्वमैदान २०२६ हा केवळ क्रीडा स्पर्धांचा कार्यक्रम नसून युवकांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. स्पर्धात्मक वातावरणातही खेळाडूवृत्ती, शिस्त आणि बंधुभाव जपण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.

या क्रीडा स्पर्धेत बाह्य (आउटडोअर), अंतर्गत (इनडोअर) आणि थलेटिक्स अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. आउटडोअर प्रकारांमध्ये व्हॉलीबॉल (मुले), थ्रोबॉल (मुली), फुटबॉल (मुले), क्रिकेट (मुले व मुली), खो-खो तसेच कबड्डी या स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. इनडोअर खेळांमध्ये टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ आणि बॅडमिंटन या स्पर्धांचा समावेश आहे. तर थलेटिक्स प्रकारात १०० मीटर व २०० मीटर धावणे, ४x१०० मीटर रिले, डिस्कस थ्रो, जेव्हलिन थ्रो, शॉटपुट आणि लाँग जंप या स्पर्धा होणार आहेत.

या स्पर्धेची सुरुवात दि. २२ मार्च २०२६ रोजी होणार आहे. दि. २२ मार्च ते २९ मार्च या कालावधीत लीग आणि नॉकआउट सामने खेळवले जाणार आहेत. दि. ३० मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता उद्घाटन समारंभ पार पडणार आहे. त्यानंतर दि. ३० मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत उपांत्य आणि अंतिम सामने खेळवले जातील. स्पर्धेचा समारोप समारंभ दि. ३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

या स्पर्धेत विविध वैद्यकीय महाविद्यालयांमधील ६८५ पेक्षा अधिक खेळाडू सहभागी होणार आहेत. प्रत्येक महाविद्यालयातून केवळ सर्वोत्तम संघ किंवा सर्वोत्तम खेळाडूला प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली जाणार आहे. स्पर्धेत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या संस्थेला जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी प्रदान करण्यात येणार आहे.

आजच्या डिजिटल युगात युवकांना प्रत्यक्ष क्रीडांगणाशी जोडण्याचा आणि त्यांच्यात सकारात्मक स्पर्धेची भावना निर्माण करण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. वसुधैव कुटुंबकम या तत्त्वावर आधारित बंधुभाव आणि जागतिक शांततेचा संदेशही या क्रीडा महोत्सवातून दिला जाणार आहे. त्यामुळे 'विश्वमैदान २०२६' हा क्रीडा स्पर्धांसोबतच युवकांच्या सर्वांगीण विकासाचा महत्त्वपूर्ण सोहळा ठरणार असल्याची माहिती माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संचालक प्रा. तेजस हनुमंत कराड यांनी दिली.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील शैक्षणिक अभ्यास सहल उत्साहात संपन्न

लातूर -विद्यापीठ अनुदान आयोग बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्च (सायबर)




आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ शैक्षणिक वर्षाची शैक्षणिक अभ्यास सहल नुकतीच उत्साहात संपन्न झाली. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबत समाजातील विविध घटक, लोकांचे जीवनमान, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक रचना यांचा प्रत्यक्ष अनुभव यावा आणि आपले व्यक्तिमत्व समृद्ध व्हावे या उद्देशाने लातूर-कुडाळ-मालवण-कोल्हापूर याठिकाणी शैक्षणिक अभ्यास सहल आयोजित केली होती.या प्रवासा दरम्यान महाराष्ट्रातील विविध भागाचे निसर्ग सौंदर्य, पर्यटन स्थळे आणि सांस्कृतिक वारसा पाहण्याची संधी मिळाली. समाजकार्य महाविद्यालय, विज्ञान केंद्र, समुद्र किनारे, ऐतिहासिक किल्ले आणि धार्मिक स्थळांना भेट देऊन विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर पडली. विद्यार्थ्यांनी स्थानिक लोकांचे जीवन आणि व्यवसाय यांचीही माहिती मिळविली.

या अभ्यास सहलीमध्ये वसुंधरा विज्ञान केंद्र, कुडाळ जि.सिंधुदुर्ग या ठिकाणी भेट दिली. या संस्थेअंतर्गत समाजातील लोकांना आपल्या वसुंधरेबद्दल माहिती दिली जाते. तसेच निसर्गातील विविध प्रकारच्या वनस्पती, पिके आणि इतर अनेक बाबी वैज्ञानिक दृष्टिकोनातून लोकांपर्यंत पोहोचवल्या जातात. या ठिकाणी विविध सामाजिक कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण सुद्धा संपन्न होते. या अभ्यासालीमध्ये कोल्हापूर येथील छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्च (सायबर) च्या समाजकार्य विभागाला भेट दिली. त्यावेळी एम.एस.डब्ल्यू. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया, प्रवेश पात्रता, महाविद्यालयाच्या सर्व सोयी सुविधा, शिष्यवृत्ती, प्लेसमेंट, क्षेत्रकार्य, प्रबंध अहवाल आणि थेअरी क्लासेस आदि विविध विषयाची चर्चात्मक स्वरूपात अधिष्ठाता डॉ. सोनिया राजपूत, डॉ.डी.एम.भोसले, डॉ.एस.एस.आपटे, डॉ.के.एन.रानभरे आणि डॉ.डी.एन.वळवी यांनी सविस्तर माहिती दिली.या शैक्षणिक अभ्यास सहलीमध्ये सिंधुदुर्ग किल्ला, रंकाळा तलाव, महालक्ष्मी मंदिर, समुद्र किनारा आदी विविध ऐतिहासिक आणि मनोरंजक स्थळांना सुद्धा भेटी दिल्या.

या अभ्यास सहलीमध्ये सहल प्रमुख प्रो.डॉ.संजय गवई, प्रा.आशिष स्वामी, प्रा.भाग्यश्री भुजबळ, नंदू काजापुरे, संतोष येंचवाड यांचेसह ३९ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी होते.

या अभ्यास सहलीसाठी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सन्माननीय पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ.आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, विभाग प्रमुख प्रो. डॉ.दिनेश मौने, समाजकार्य विभागातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि अमृता ट्रॅव्हल्सचे कर्मचारी यांचे मौलिक मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

या शैक्षणिक अभ्यास सहल संबंधी बी.एस.डब्ल्यू.प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांचे चर्चासत्र घेण्याचेही निश्चित करण्यात आले आहे.

# लातूर जिपच्या अध्यक्षा उषाताई पाटील यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून अभिनंदन

लातूर - महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.



देवेंद्रजी फडणवीस यांनी लातूर जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. उषाताई संभाजी पाटील तळेगावकर यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले, भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

यावेळी मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांनी आगामी पाच वर्षात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी आणि सर्वांगीण विकासाची गंगा घराघरांत पोहोचवण्यासाठी अनमोल सूचना केल्या.मुंबई येथील या सदिच्छा भेटीप्रसंगी पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले, भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड, अरविंद पाटील निलंगेकर, जिपचे गटनेते रामचंद्र तिरुके, संभाजी पाटील तळेगावकर, नगरसेवक शहाजी पाटील तळेगावकर, भरत चामले आणि कु. भक्ती तळेगावकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# आज श्रीकृष्ण आश्रम येथे ह.भ.प. रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन

केज/प्रतिनिधी -उद्या गुरुवार रोजी



ह.भ.प. रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचे अमृततुल्य काल्याच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे, तरी या कार्यक्रमास भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्रीकृष्ण आश्रमाचे संस्थापक ह.भ.प. भागवत भूषण केशव महाराज शास्त्री यांनी केले आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज येथील बीड रोडवरील श्रीकृष्ण आश्रम, भक्तिपरिवार येथे श्रीकृष्ण मंदिर भूमिपूजन निमित्त १०८ कुंडी भव्य महाविष्णू याग, संगीत रामकथा व अखंड हरिनाम सप्ताह हा कार्यक्रमास दिनांक ११ मार्च २०२६ पासून दैनंदिन कार्यक्रम:-पहाटे ४ ते ६ काकडा, ६ ते ७ विष्णूसहस्त्रनाम,७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १३ गाथा भजन,२ ते ५ संगीत रामकथा,५ ते ७ हरिपाठ, ८ ते १० हरीकिर्तन व १० ते ४ हरी जागर हे कार्यक्रम अखंडपणे चालू आहेत या कार्यक्रमाची सांगता ही गुरुवार दिनांक १९ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत श्री. ह.भ.प. रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन संपन्न होईल. त्यानंतर महाप्रसाद, भोजन होईल. तरी या कार्यक्रमास केज शहरासह तालुक्यातील व जिल्ह्यातील आणि बाहेरील इतर ठिकाणच्या भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन ह.भ. प.भागवत भूषण केशव महाराज शास्त्री व श्रीकृष्ण आश्रम भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

आज पर्यंत या कार्यक्रमास केज शहरासह तालुक्यातील व बीड जिल्ह्यातून आणि छत्रपती संभाजी नगर, मुंबई, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, लातूर, धाराशिव, अमरावती, वाशिम, नाशिक, नांदेड, हिंगोली, परभणी, वसमत यासह विविध ठिकाणच्या भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली आहे.

# राज्यसभेच्या सिंहासनावर खा.रजनीताई विराजमान

केज/प्रतिनिधी□महाराष्ट्राच्या जेष्ठ नेत्या खा. रजनीताई पाटील यांना काल राज्यसभेत पिठासिन अधिकारी म्हणून काम करण्याचा बहुमान मिळाला. दिवसभराचे संपुर्ण कामकाज त्यांच्या नियंत्रणात पार पडले.पिठासिन अधिकारी म्हणून त्यांनी प्रभावीपणे काम केले याच सभागृहात काही वर्षापुर्वी खा. रजनीताईंना निलंबनाच्या कारवाईला सामोरे जावे लागले होते. अर्थात ही कारवाई काही दिवसातच रद्द करण्यात आली होती. मात्र काल रजनीताईंचा राजयोग पहायला मिळाला. राज्यसभेतील सर्वोच्च अशा सिंहासनावर विराजमान होण्याची संधी त्यांना मिळाली.अशा संधीचे सोने करत त्यांनी ही जबाबदारी यशस्वीरीत्या पूर्ण केली.



राज्यसभेतील पिठासीन अधिकारी हे पद अत्यंत महत्त्वाचे आणि जबाबदारीचे असते. या पदामुळेच सभागृहातील कामकाज सुरळीत, नियमबद्ध आणि निष्पक्ष पद्धतीने चालते. राज्यसभेचे स्थायी भारताचे उपराष्ट्रपती (हे राज्यसभेचेसभापती असतात) त्यांच्या अनुपस्थितीत पसभापती किंवा इतर नियुक्त सदस्य पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहतात. या पदावरील व्यक्ती सभागृहाचे संचालन चर्चा, प्रश्नोत्तर, विधेयके यांचे नियोजन करत असतात. सदस्यांमध्ये शिस्त राखणे,गोंधळ झाल्यास कारवाई करणे, कार्यपद्धती व नियमांचे योग्य पालन होईल याची खात्री करणे मतदानात बरोबरी झाल्यास निर्णायक मत देणे, निष्पक्षता राखणे, कोणत्याही पक्षाचा पक्षपात न करता काम करणे ही त्यांची जबाबदारी असते. अशा अत्यंत महत्वाच्या पदावर खा. रजनीताई पाटील यांना काम करण्याची संधी काल मिळाली. या उच्च सिंहासनावर विराजमान झालेल्या रजनीताईंना पाहून प्रत्येक मराठी माणसाची मान अभिमानाने उंचावली गेली.

# सनरीच माहेश्वरी प्रिमिअर लीग स्पर्धेचे विजेतेपद निर्मल ग्लॅडिएटर्सने पटकावले महिला संघाचे जेतेपद शिवास स्ट्रायकर्सने जिंकले





लातूर : लातूर जिल्हा माहेश्वरी युवा संगठन , युवा माहेश्वरी एवं किशोरी मंडळाच्या सनरीच एमपीएल ( माहेश्वरी प्रिमिअर लीग) स्पर्धा २०२६ चे पुरुषांच्या संघाचे

विजेतेपद निर्मल ग्लॅडिएटर्सने पटकावले. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या सामन्यात महिला संघाचे जेतेपद शिवास स्ट्रायकर्सने जिंकले. या स्पर्धांना प्रेक्षकांचा अतिशय उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.

सनरीच एमपीएल २०२६ च्या पुरुषांच्या स्पर्धा दयानंद महाविद्यालयाच्या क्रिकेट ग्राऊंडवर पार पडल्या. या स्पर्धेचा अंतिम सामना आशिष सोमाणी यांच्या निर्मल ग्लॅडिएटर्स आणि रंजन बाहेती यांच्या राजश्री मोनार्क्स या दोन संघात झाला. यामध्ये निर्मल ग्लॅडिएटर्स विजयी ठरला. राजश्री मोनार्क्स ला उपविजेतेपद मिळाले. महिलांचे सामने ग्रँडस्लॅम टर्फवर खेळविण्यात आले. महिला संघाचा अंतिम सामना शिवास स्ट्रायकर्स विरुद्ध राजमुंद्रा वॉरियर्स यांच्यात झाला. यात शिवास स्ट्रायकर्सने जेतेपद पटकावले. या स्पर्धेत खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ व खिलाडूवृत्तीने प्रदर्शन केले. या स्पर्धे चे मुख्य प्रायोजक सनरीच कंपनी हे होते. तर सह प्रायोजक म्हणून धनराज सॉल्व्हेक्स, मुंदडा इंटेरिओ,इंदू टाईल्स, वेंकटेश सिरॅमिक्स, सुनंदा सोलार पॉवर यांनी जबाबदारी सांभाळली.

सनरीच एमपीएलच्या सर्व स्पर्धांना क्रिकेट रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. पुरुष व महिला खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून लातूरकरांनी मने जिंकली. या स्पर्धे च्या यशस्वीतेसाठी प्रोजेक्ट चेअरमन अमित भुतडा, आलोक बाहेती, पुष्कर तोष्णीवाल, निकुंज भुतडा, एड. योगेश मालपाणी, अमित भुतडा, प्रांजल डागा , अभिषेक मुंदडा, सीए गिरीश सोनी, सीए अभिषेक डागा, केदार मुंदडा, कृष्णा लाहोटी,कृष्णा सोनी, महेश तोष्णीवाल, सीए निलेश चांडक, रोहन सोनी, रुपेश हेड्डा, संस्कृती लोया, रितेश रांदड, गौरव बाहेती, रामजी भुतडा, विशाल काबरा, दीपक बजाज यांसह लातूर जिल्हा माहेश्वरी युवा संगठन , युवा माहेश्वरी एवं किशोरी मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# बारावीनंतर करिअरची निवड करताना आवड, क्षमता आणि संधी यांचा संगम साधा

लातूर,- विद्यार्थ्यांनी आपल्या आवडी-निवडी, क्षमता आणि भविष्यातील उद्दिष्टे लक्षात घेऊन करिअरची निवड करणे अत्यावश्यक आहे. योग्य मार्गदर्शन, तज्ज्ञांचे सल्ले तसेच विविध क्षेत्रांबाबतची सखोल माहिती यांचा योग्य वापर केल्यास विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी योग्य दिशा निश्चित करता येते, असे प्रतिपादन एमआयटी करिअर गाईडन्स सेलचे प्रमुख श्री. बळीराम हांडगे यांनी केले.



एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने 'बारावीनंतर पुढे काय?' या विषयावर आयोजित करिअर मार्गदर्शन मेळाव्यात श्री बळीराम हांडगे बोलत होते. यावेळी पुणे येथील एडीटी विद्यापीठाचे डॉ. उल्हास माळवदे, प्रा. अमित उत्तरकर तसेच वैद्यकीय मानसशास्त्रज्ञ प्रा. संदेश नागरगोजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना श्री. हांडगे म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक आणि वेगाने बदलणाऱ्या शैक्षणिक युगात बारावीनंतर योग्य करिअर निवड करणे हे विद्यार्थ्यांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. शिक्षणाच्या विविध शाखा आणि अभ्यासक्रमांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे विद्यार्थ्यांसमोर अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. मात्र या पर्यायांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होत असून योग्य निर्णय घेणे कठीण जात आहे.

विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय, अभियांत्रिकी, फार्मसी, फिजिओथेरपी, बायोटेक्नॉलॉजी, नर्सिंग यांसारख्या क्षेत्रांमध्ये करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी सीए, सीएस, बीबीए, बीकॉम, बँकिंग आणि फायनान्स या क्षेत्रांमध्ये उज्ज्वल भविष्य घडवण्याच्या संधी आहेत. कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी पत्रकारिता, मानसशास्त्र, समाजशास्त्र, डिझाईन, प्रशासन, शिक्षण व संशोधन अशा विविध क्षेत्रांचे दरवाजे खुले आहेत.

वैद्यकीय शिक्षणाबाबत माहिती देताना श्री. हांडगे यांनी एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस, बीपीटी या अभ्यासक्रमांची माहिती सविस्तरपणे दिली. तसेच निट परीक्षेची तयारी, प्रवेश प्रक्रिया आणि देश-विदेशातील शिक्षणाच्या संधी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध संधींबाबत डॉ. उल्हास माळवदे आणि प्रा. अमित उत्तरकर यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. संगणक अभियांत्रिकी, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डेटा सायन्स, मेकॅनिकल, सिव्हिल तसेच इलेक्ट्रॉनिक्स अशा विविध शाखांमध्ये करिअरच्या व्यापक संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, जेईई आणि एमएचटी-सीईटी यांसारख्या प्रवेश परीक्षांची तयारी, भविष्यातील तंत्रज्ञानातील प्रगती आणि उद्योजकतेच्या वाढत्या संधी याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

करिअर निवडीत मानसशास्त्राचे महत्त्व अधोरेखित करताना प्रा. संदेश नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व, आवड आणि क्षमतेनुसार करिअर निवड करण्याचा सल्ला दिला. त्यांनी पालकांनाही विद्यार्थ्यांवर अनावश्यक दबाव टाळून त्यांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष देणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

मेळाव्यात आयोजित प्रश्नोत्तर सत्र हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम निवड, प्रवेश प्रक्रिया, परदेशातील शिक्षण तसेच योग्य महाविद्यालय निवड यासंदर्भात विविध प्रश्न विचारले. तज्ज्ञांनी या सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे देत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परमेश्वर सोनवणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मावीय सय्यद यांनी केले. लातूर जिल्हा व परिसरातील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.